**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांचा पुरावा**
**मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | उमेश पोपट खराडे, |
| वय | – | ४५ वर्षे, |
| हुद्दा | – | वनरक्षक, |
| नेमणुक | – | रेहेकुरी अभयारण्य, कर्जत, जि. अहमदनगर. |

**सरतपासणी – सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी. के. पाटील यांचे मार्फत–**

दि. ३१/०७/२०१३ रोजी मी वनविभाग चिकलठाण येथे सर्व्हे क्र. ३१ मध्ये स्टाफसह गस्त घालत असताना आरोपी नामे विकास पांडुरंग काकडे हे शेती करण्याच्या उद्देशाने जे.सी.बी. च्या सहाय्याने जंगलातील झाडांची मोडतोड करुन साफसफाई केली होती, त्यांनी झाडांची विल्हेवाट देखील लावली होती. त्यामुळे मी व माझ्या स्टाफने जमीन मोजली असता आरोपीने १ हे. ६० आर एवढ्या क्षेत्रातील झाडे तोडून अतिक्रमण केले होते. माझा जबाब नोंदविण्यात आला होता. त्यावर मी वाचून सही केली होती. आरोपीस पाहिल्यास ओळखू शकतो. आजरोजी तो न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. इ. आर. खपके यांचे मार्फत–**

हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यावेळी मी वांबोरी येथे वनरक्षक म्हणून कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, वांबोरी ते शेरी चिकलठाण हे अंतर ५० किलोमीटर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वांबोरी येथे कार्यरत असल्यामुळे मला शेरी चिकलठाण व इतर भागातील वनविभागाची माहिती नाही. त्यावेळी माझे वरिष्ठ अधिकारी जंबे साहेब होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. ३१/०७/२०१३ रोजी जंबे साहेब यांनी मला शेरी चिकलठाण येथे गस्त घालणेबाबत लेखी आदेश दिला नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, तोंडी आदेश दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरील तोंडी आदेशाबाबत

कोणतीही कार्यालयीन टिप्पणी केलेली नाही. सदरील वेळी शेरी चिकलठाण येथे कार्यरत असलेल्या वनविभागाच्या कर्मचा–यांची नावे मला सांगता येतील. त्यावेळी वनरक्षक सचिन शिंदे, भानुदास गागरे कार्यरत होते. हे म्हणणे खरे आहे की, भानुदास गागरे हे म्हैसगाव येथे कार्यरत होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांच्या अधिपत्याखाली सर्व बिट येत होते. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनास्थळाचा गट क्रमांक माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र. ३१ चे संपूर्ण क्षेत्र किती आहे हे मला सांगता येणार नाही. स्थानिक वनरक्षकाकडे कोणत्या ठिकाणी कोणते झाड लावले याबाबत नोंदी असतात. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे बिरोबाच्या माळामध्ये असून ते ४० ते ५० एकर एवढे खुले वनक्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरील क्षेत्र संपूर्ण खडकाळ असून तेथे झाडे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, सदरील क्षेत्रात फक्त खुरटी झाडे होती. हे मला माहीत नाही की, घटनास्थळाच्या शेजारी आरोपीचे शेत आहे. मी व माझ्या वरिष्ठ अधिका–याने आजुबाजुच्या क्षेत्राची चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या स्टाफने व वरिष्ठ अधिका–यांनी आरोपीला जे.सी.बी. ने सदरील शेत साफ करताना पाहिलेले नाही, तसेच वापरण्यात आलेला जे.सी.बी. देखील पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतः आरोपीला शेतासाठी जागेचे अतिक्रमण करताना पाहिले नसल्यामुळे त्याने झाडांची तोड केल्याचे मी ठाम सांगू शकत नाही.

हे मला माहीत नाही की, घटनास्थळाच्या शेजारी आरोपीचे शेत असून त्याचा गट क्र. १६१ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी लगत कब्जेदार असल्यामुळे आम्ही त्याच्यावर सदरील खोटी केस दाखल केली. हे मला सांगता येणार नाही की, सर्व्हे क्र. ३१ मधील बरेचशे क्षेत्र वहिवाटी खाली असून काही क्षेत्र मुळा डॅम करिता संपादीत केले आहे, तसेच गुरे चारण्यासाठी काही क्षेत्र राखीव आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व्हे क्र. ३१ मध्ये कोणते क्षेत्र कशासाठी आहे याबाबत मला माहीत नाही. हे मला माहीत नाही की, शासनाने त्यातील काही जमिनी खाजगी लोकांना वहितीकरिता दिलेली आहे. हे म्हणणे खरे

नाही की, आरोपीने वनक्षेत्राची मागणी वहितीसाठी करु नये म्हणून सदरील खोटी केस दाखल करण्यात आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने झाडे तोडलेली नाही व सदरील गुन्हा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीविरुध्द सरतपासात जे काही सांगितले आहे ते खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

'श्रवणोत्तर स्विकृत'

Digitally signed by ANUPAMA CHANDRASHEKHAR PARSHETTI
Date: 2025.11.11 17:45:27 +0530

**( श्रीमती अनुपमा चं. पारशेट्टी )**

दिनांक – ११/११/२०२५.

प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, राहुरी.